Regn. No. MAHMAR/2000/03666

# निर्भय आंदोलन

सामान्यांचे व्यासपीठ

वर्ष दहावे    अंक ५ वा    जून २०१०    किंमत रु. ५/-

संपादकीय

# महानगरपालिका आणि नगरसेवक

वसई-विरार महानगरपालिकेची निवडणूक एकदाची पार पडली आणि ८९ नगरसेवक निवडून आले. यामध्ये ४९ नगरसेवक बिल्डर असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. तेव्हा या नगरसेवकांचे भावी उद्योग लक्षात घेता या सुंदर वसईचे काय होणार ही धोक्याची घंटा आताच वाजू लागली आहे. मागील वीस वर्षे वसईचा विकास ( ? ) सुरूच आहे. आता या निसर्गसंपन्न हिरव्या बागायती पट्ट्यावर सिमेंट काँक्रिटची जंगले उभारून विकास करायच्या युक्त्या सुरू होतील. या ८९ पैकी ६१ म्हणजे दोन तृतियांश बहुजन विकास आघाडीचे तर १९ म्हणजे १/४ हून कमी जनआंदोलनचे उमेदवार नगरसेवक म्हणून निवडून आले. राज्यात ज्यांची सत्ता आहे त्या काँग्रेसला ४८ पैकी २ तर राष्ट्रवादीला ४६ पैकी एकही जागा मिळाली नाही. ज्यांच्या कलाने काँग्रेस सरकार वसईत नियोजनाचे आराखडे बनवीत होती त्या काँग्रेसला बहुजन आघाडीशी युती करायची होती पण ती यावेळी जमली नाही. पण आम्ही नाही त्यातले अशी सोंगे करायला काँग्रेस पुढे होतीच. अन्य काही विरोधक ( ? ) निवडून आले. आता ते विरोधात बसून काम करणार आहेत. हळूहळू त्यातले काही बहुजन विकास नौकेत यथावकाश बसणारच नाहीत असे नव्हे! नाहीतरी विकास करायचाच आहे!

काही नेत्यांना आता स्विकृत नगरसेवक पद हवे आहे. तसा दावा त्यांनी केल्याचे वाचले! महानगरपालिका नको म्हणणाऱ्यांनी आणि राजकारण नको म्हणणाऱ्यांनी स्विकृत नगरसेवक पदाचा मोह का बाळगावा हा प्रश्न जनतेने त्यांना विचारू नये. कारण आगाशी-शिवसेना, नंदाखाल-मनसे, वाघोली-भाजप, निर्मळ-शिवसेना, भुईगांव-श्रमजीवी, कौलार-श्रमजीवी, मुळगांव-शिवसेना असा एकूण पश्चिम पट्टा भगवा करण्याची बहादूरी गाजवणारे हे विसरतात की काँग्रेस-जनता दलाने या पट्ट्यात उमेदवार दिले असते तर किती भगवे फडकले असते? आम्हांलाही पाच-पन्नास लोक ओळखतातच! अगदी नवघर-माणिकपूर-जुचंद्र-कामणमध्ये सुद्धा! पण ज्या गावाचा महानगरपालिकेत जायला विरोध आहे त्या गावातून आणि १५० वर्षे जुन्या वसई नगरपरिषद क्षेत्रात महानगरपालिकेची निवडणूक लढवू नये अशी भूमिका आम्ही घेतली. चांगले उमेदवार असूनही या पट्ट्यात एकही उमेदवार दिला नाही. काँग्रेसनेही तीच भूमिका पुढे घेतल्याने एकास एक अशी सरळ दुरंगी लढत होऊ शकली. मैदान मोकळेच होते. त्यात कसली बहादूरी! हो तशी ही बहादूरीच! कारण काँग्रेस-समाजवादी मतदारांचे भगवीकरण करण्याची किमया अन्य कोणाला जमली नसतीच!

आता वर्ष-सहा महिन्यात सर्वांना ग्रामपंचायतीचे विस्मरण होईल. सत्ता श्रेष्ठ असल्याने महानगरपालिकेचे समर्थक वाढतील आणि ग्रामपंचायती इतिहासजमा होतील. गावे वगळली-विरारच्या कचाट्यातून सोडवली सांगणारे हळूहळू तांत्रिक मुद्याचा बहाणा सांगून महानगरपालिकेत ''तुझ्या गळा माझ्या गळा'' सांगत ''जय विकास'' करीत व्यवहाराच्या गोष्टी करतील आणि आमची २००६ पासूनची महानगरपालिका विरोधाची श्रमाची तप:श्चर्या वसईच्या अरबी समुद्रात बुडालेली असेल. सत्तेचे सोपान गाठण्यासाठी मागाहून उगवलेल्यांना महानगरपालिकेचे रेडीमेड आंदोलन आयतेच गवसले आणि कायद्याऐवजी हाणामारीने गाजले. या सर्वांचा समाचार आम्ही घेऊच. सद्या प्रतिक्रिया येत आहेत. म्हणून थांबण्याचे ठरवले आहे.

आता जन आंदोलनच्या सर्व नगरसेवकांनी गावे खरोखरच वगळण्यासाठी महानगरपालिकेचा ठराव मंजूर करायच्या मागे लागावे. गावे वगळण्याचा ठराव मंजूर करण्यासाठी कोणी बँकेप्रमाणे बहुजनांशी मांडवली केली तरी लोकांनी काही बोलू नये. मात्र गावे वगळण्याचा ठराव मंजूर होऊ शकला नाही तर लोकांनी या सर्व नगरसेवकांना राजीनामे द्यायला भाग पाडावे. सत्तेच्या गणितामुळे राजकीय पक्षांनी आपल्या निष्ठा तात्पुरत्या खिशात ठेवल्या होत्या. आता निवडून आल्यावर जो तो आपल्या मूळ प्रवाहात चालला आहे. आता महानगरपालिकेतून गावे वगळण्याच्या भूमिकेत कितीजण प्रामाणिक राहतात ते आता पाहायचे. ★★★

# निर्भय आंदोलन

सामान्यांचे व्यासपीठ Regn. No. MAHMAR/2000/3666

## निर्भयचे संपादक मंडळ

**संपादक, मुद्रक, प्रकाशक : मनवेल तुस्कानो**

**सहसंपादक :** उदय सामंत

**सहाय्यक :** जॉन परेरा, पायस मच्याडो, प्रा. ट्रिजा परेरा

**अक्षरजुळणी :** वसई तालुका सहकारी मुद्रणालय लि., वसई रोड.

**छायाचित्र :** सरोज रॉड्रीग्ज, डेनिस डिसोजा, विजय रॉड्रीग्ज

**वेबसाईट - www.Vasaikar.org**

## वाचकांना नम्र निवेदन

मागील १० वर्षापासून आम्ही आपणास निर्भय आंदोलनचे अंक पाठवित आहोत. वृत्तपत्र चालवणे पैशाशिवाय शक्य होत नाही. म्हणून आम्ही १ जानेवारी २०१० पासून ज्या वाचकांनी वर्गणी भरलेली आहे अशांनाच अंक पाठविण्याचे ठरविले आहे. ज्या वाचकांनी वर्गणी भरली नसेल त्यांनी २०१०-११-१२ या तीन वर्षाची वर्गणी रु. २५०/- पाठवून द्यावी किंवा बॅसीन कॅथॉलिक बँकेच्या कोणत्याही शाखेत ''निर्भय जन मंच बचत खाते क्र. ९१६४, नंदाखाल शाखा'' या नावाने भरुन आम्हांला कळवावे ही नम्र विनंती. - संपादक

## निर्भयला हक्काची मदत

| | | |
|---|---|---|
| श्रीमती गीता अंड्राडिस, मर्सेस-वसई | रु. | १,०००/- |
| श्रीमती जॉना आलेक्स कोरीया, नांदाण-नंदाखाल | रु. | १,०००/- |
| श्री. जेकब विन्सेंट कोरीया, , नांदाण-नंदाखाल | रु. | ५००/- |
| अनामिक, नंदाखाल | रु. | ५००/- |
| श्री. रॉबर्ट सिल्वेस्टर कोरीया, नांदाण-नंदाखाल | रु. | ३००/- |
| श्री. विल्यम जे. रॉड्रीग्ज, पापडी-वसई | रु. | २५०/- |
| श्रीमती शिला आलेक्स डिमेलो, माणिकपूर-वसई | रु. | २५०/- |
| श्री. सुरेश दिब्रिटो, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. अशोक ब्रिटो, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. प्रकाश कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. जॉर्ज कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. लुईस सिल्वेस्टर कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. राजू कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. विनोद कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. संदिप कोरीया, उंगणभाट-नंदाखाल | रु. | २५०/- |
| श्री. जोजेफ मर्यान लोपीस, माणिकपूर-वसई | रु. | १००/- |

# संत जोजेफ पतपेढी निवडणूक

संत जोजेफ पतपेढीची निवडणूक नुकतीच पार पडली. जनता दलाचे समाजवादी व्हेलेरियन घोन्सालविस यांच्या नेतृत्वाखाली सहकार पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून आले इतके की त्यांना ८०% मते मिळाली आणि जनआंदोलनच्या परिवर्तन पॅनलला २०% मते मिळाली. सर्व वर्तमानपत्रांनी या निवडणूकीची वृत्ते मोठ्या मथळ्याने दिली.

वास्तविक संत जोजेफ पतपेढीसारख्या ख्रिस्ती समाजाच्या संस्थेच्या निवडणूकीत राजकीय ढवळाढवळ करायचे कारण नव्हते. पण जनआंदोलनच्या नेत्यांनी ख्रिस्ती समाजाच्या भाबडेपणाचा फायदा घेऊन ही आर्थिक संस्थाही आपल्या टाचेखाली आणण्याचा प्रयत्न केला तो सभासदांनी हाणून पाडला. असे का घडले याचे चिंतन ते करणार नाहीत पण पतपेढीच्या सर्व सभासदांनी बऱ्यापैकी चिंतन केलेले दिसते. मॉन्सि. मोनीस सारख्या धर्मगुरूने स्थापन केलेल्या आणि थोरामोठ्या ख्रिस्ती नेत्यांनी नावारुपाला आणलेल्या बॅसीन कॅथोलिक बँकेत केवळ आपल्या मर्जीतल्या व्यक्तीला अध्यक्ष करण्यासाठी वसई विकास मंडळाबरोबर हातमिळवणी कशी झाली आणि राजीव पाटील यांच्याबरोबर चेअरमनच्या केबीनमध्ये विजयाची दोन बोटे दाखवणारे कसे एकवटले होते हे सारे या पतपेढीच्या सभासद मतदारांना आठवले असेल. म्हणूनच अध्यक्षीण बाईंनी खूप सांगूनही सभासदांनी ते ऐकले नाही. ही पुढील नांदी आहे.

संत जोजेफ पतपेढी रमेदी येथील पूर्वीच्या संत जोजेफ फंडातून निर्माण झाली. तेथील ख्रिस्ती समाजाच्या धुरीणांनी खस्ता खाऊन ती उभी केली. अंतोनी रॉड्रीग्ज मास्तरांनी सुरु केलेल्या संत जोजेफ फंडातून ही संस्था उदयास आली. विल्यम रॉड्रीग्ज, झुजू फुडतात, नोव्हेल फुर्ट्याडो, आशिष फुडतात, आलेक्स फलकांव, आलेक्स डिकुन्हा, फ्रान्सिस फुर्ट्याडो, आन्सेल्म परेरा व आता व्हेलेरियन घोन्सालविस यांनी ती नावारुपाला आणली. ही संस्था आपल्या पायाखाली यावी असे काहींना वाटत होते. सत्ता आता सर्वच क्षेत्रातली आपल्या हाती असावी असाही मोह काहींना झाला. म्हणूनच जन आंदोलनची बॅट हाती घेऊन खालच्या पातळीवर भरपूर बॅटींग करण्यात आली. लाऊडस्पीकरवरून दिवसभर प्रचार करण्यात आला. पतपेढी बुडत आहे, ठेवी काढा असे चिथावत महाव्यवस्थापकाचा पगारसुद्धा काढला. अशा पातळीवर प्रचार करण्यात आला. पण पतपेढीच्या सभासदांनी या प्रचाराला दाद दिली नाही. त्यांनी पतपेढीची सुरक्षितता अग्रक्रमाने पाहिली आणि व्हेलेरियन घोन्सालविस यांच्यासारख्या नेतृत्वाखालील उमेदवारांना संचालक म्हणून मोठ्या मताधिक्याने निवडून दिले.

# वीज दरवाढी विरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका व वीज ग्राहकांचे राज्यस्तरीय सामूहिक आंदोलन

**- प्रताप होगाडे**, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटना

एका बाजूने सातत्याने प्रचंड वेगाने वाढत जाणारे वीजदर आणि दुसऱ्या बाजूने किमान ३ तासापासून ते १२ तासापर्यंतच्या भारनियमनामुळे संपूर्ण राज्यभर पसरलेले अंधाराचे साम्राज्य हे आजच्या महाराष्ट्राचे वास्तव चित्र आहे. एकेकाळी राज्याला पुरेल इतकी वीज निर्माण करुन अन्य राज्यांना वीज देणारा महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख होती. आज देशात सर्वाधिक वीजेचा तुटवडा असणारे राज्य ही महाराष्ट्राची लाजिरवाणी ओळख आहे. १९९२ नंतर किमान १ तपाहून अधिक काळ एन्रॉनच्या भरवशावर विसंबून राहून सेना, भाजपा, काँग्रेस व राष्ट्रवादी या राज्यातील चारही प्रमुख भांडवलदारी पक्षानी राज्याच्या वीजक्षेत्राचा पुरता खेळखंडोबा केला आहे. महाराष्ट्रातील निष्क्रीय, नाकर्त्या, अप्रामाणिक व इच्छाशक्ती विहीन सत्ताधाऱ्यांच्या गेल्या १५ वर्षातील पापांची फळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य वीजग्राहक जनता, विद्यार्थी, महिला, कामगार, शेतकरी व लघुउद्योजक या सर्व वर्गातील जनतेला भोगावी लागत आहेत.

येत्या २ वर्षात तुटवडा संपेल अशी आश्वासने राज्यातील सर्व मंत्री गेली ७-८ वर्षे देत आहेत. आता भाषा बदलली आहे. 'महाराष्ट्र ३ वर्षात भारनियमन मुक्त होईल' असे आश्वासन दिले जात आहे. पण आणखी ५ वर्षांनीही हेच आश्वासन ऐकावे लागेल ही वस्तुस्थिती आहे. मागणी दरवर्षी १००० ते १२०० मेगॅवॅटने वाढणार आहे. उपलब्धताही फार तर त्याच गतीने वाढेल आणि आजचीच परिस्थिती ४-५ वर्षानंतरही असेल हीच वस्तुस्थिती आहे.

देशाच्या पातळीवरही चित्र काही वेगळे नाही. ९ व्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट ४०,२४५ मेगॅवॅट होते, अंमलबजावणी १९,०१५ मेगॅवॅटची झाली. १० व्या पंचवार्षिक योजनेचे उद्दिष्ट ४१,११० मेगॅवॅट होते, पूर्ति २१,२८० मेगॅवॅटची झाली. ११ व्या पंचवार्षिक योजनेत ७८,७०० मेगॅवॅटची स्वप्ने दाखविली जात आहेत. पण पहिल्या अडीच वर्षात स्वप्नपूर्ती फक्त १८,४३५ मेगॅवॅटचीच झाली आहे. मागची वस्तुस्थिती पाहिली तर आजची राज्य व केंद्र सरकारची उद्दिष्टे म्हणजे केवळ स्वप्नरंजन व कल्पनाविलास आहे हेच स्पष्टपणे दिसून येत आहे.

वीजेची वाढती मागणी पुरविण्यासाठी अथवा भारनियमन टाळण्यासाठी जादा वीजनिर्मिती, उर्जाबचत इ. प्रामाणिक प्रयत्न करायचे नाहीत. ग्राहकांना सेवा देण्याच्या नावाकाली वाटेल त्या दराने महागडी वीज खरेदी करायची, वाढीव दराने ती ग्राहकांच्या माथ्यावर मारायची व नफा कमवायचा, एवढाच एकमेव धंदा सध्या राज्यातील सर्व वितरण कंपन्या करीत आहेत. वीजनिर्मिती आणि वितरण कंपन्यांच्या अकार्यक्षमतेची किंमत प्रचंड वीज दरवाढीच्या रुपाने ग्राहकांना मोजावी लागत आहे. हस्तक्षेप करण्याचा अधिकार असलेले सरकार डोळ्यावर कातडे ओढून, आयोगाकडे बोट दाखवून नामानिराळे व बेफीकीर आहे. वीज नियामक आयोग हा या लुटारु वितरण कंपन्यांचे दर ठरवून त्यांची वसूली करुन देणारा दलाल बनला आहे. सर्वसामान्य वीज ग्राहकांची मात्र पिळवणूक, लुबाडणूक व विश्वासघात केला जात आहे. एका वर्षात कितीवेळा वीज दरवाढ व्हावी याला कोणताही ताळतंत्र राहिलेला नाही. १ ऑगस्ट २००९ पासून दरवाढ लागू झाली. महावितरणचा सरासरी वीज पुरवठा दर ३६२ पैसे / युनिट वरून ४३५ पैसे / युनिट झाला. ही वाढ २०% म्हणजे एकूण ११०० कोटी रुपये आहे. आता पुन्हा दाभोळच्या कपॅसिटी चार्जपोटी राज्यातील सर्व ग्राहकांनी ३५ पैसे / युनिट जादा भरावे लागणार आहेत. हा भुर्दंड पुन्हा ७८६ कोटी रु.चा आहे. याशिवाय राज्य सरकारने विद्युत करामध्ये वाढ करुन ७२४ कोटी रु. ची दरवाढ लादली आहे. केवळ ६ महिन्यात २६०० कोटी रु. दरवाढ झाली आहे. या सर्व वाढीव दरांची बिले येण्यापूर्वीच पुढच्या महिन्यात इ. स. २०१०-११ सालासाठी नवीन दरप्रस्ताव दाखल होईल. याशिवाय दर महिन्याला वाढत जाणार इंधन अधिभार आहेच. वर्षभर सातत्याने ग्राहक दरवाढीच्या चक्रात भरडला जात आहे, त्याची फिकीर आयोग वा सरकार कुणीही करत नाही.

या सगळया दरवाढीचे एक मूळ महागड्या वीजेच्या खरेदीमध्ये आहे. स्वत:ची निर्मिती न वाढविता महागडी वीज विकत घेऊन ग्राहकांना विकायची हाच खरेदी विक्रीचा व्यापार वितरण कंपन्या करु लागल्या आहेत. महावितरणचा सरासरी पुरवठा खर्च ४ वर्षात ३०० पैसे / युनिट वरुन आता ४७० पैसे / युनिट वर गेला आहे. बेस्टचा सरासरी दर यावर्षी ६३४ पैसे / युनिट झाला आहे. तो २ वर्षापूर्वी इ. स. २००७-२००८ साली ४७१ पैसे / युनिट होता. रिलायन्सचा सरासरी वीज पुरवठ्याचा दर यावर्षी आयोगाने ७७० पैसे / युनिट निश्चित केला आहे. तो ३ वर्षापूर्वी इ.स. २००६-०७ साली ४०१ पैसे / युनिट होता. गेल्या फक्त ३ वर्षात एवढी प्रचंड दरवाढ व एवढी लूट केवळ महागड्या वीजेमुळे झालेली आहे आणि याला पुन्हा २४ तास वीज, झीरो लोडशेडींग, ग्राहक सेवा अशी गोंडस नावे दिली जात आहेत.

रिलायन्सची निर्मिती फक्त ५०० मेगॅवॅट आहे. मागणी १५०० ते १७०० मेगॅवॅट आहे. एकूण गरजेच्या २/३ हिस्सा वीज रिलायन्स बाहेरून खरेदी करते. बेस्टला टाटाकडून रास्त दराने ५०० मेगॅवॅट वीज मिळते. मागणी ७५०/८०० मेगॅवॅट आहे. त्यामुळे बेस्ट १/३ हिस्सा वीज बाहेरून महाग दराने खरेदी करते. महावितरणची महागड्या विजेची खरेदी आता एकूण गरजेच्या १५% च्या वर गेली आहे. कोणत्याही दराने महागडी विज खरेदी करायची, कोणत्याही दराने बिले घ्यायची आणि बिलानुसार सर्व खर्च, व्याज, घसारा, नफा यासह पै अन् पै ग्राहकांकडून वसूल करायची, या सर्व बाबींना कायद्याचे संरक्षण व आयोगाचा वरदहस्त आहे. त्यामुळे वीजनिर्मिती वाढवून वा स्वस्त वीज मिळवून सेवा द्यावी याची गरज कोणत्याही वीज कंपनीला राहीलेली नाही.

झीरो लोडशेडींग या नावाखाली २४ तास वीजेसाठी आता पुणे,

नवी मुंबई, ठाणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या शहरातील ग्राहकांवर २१ पैसे / युनिट ते ७५ पैसे / युनिट रिलायेबिलीटी चार्ज लादला जाणार आहे. याचे मुळही ६.७५ रु. / युनिट या दराने महाग वीजेची खरेदी हेच आहे.

वितरण कंपन्यांची अकार्यक्षमता, हलगर्जीपणा, बेफिकीरी व नालायकी यांची किंमत ग्राहकाला मोजावी लागत आहे. आजही स्वस्त वीज मिळू शकते. अदानी व लान्को या कंपन्या महावितरणला अनुक्रमे १३४० मेगॅवॅट व ६६० मेगॅवॅट याप्रमाणे एकूण २००० मेगॅवॅट वीज देणार आहे. आयोगासमोर निश्चित झालेला दर इ.स. २०१२ ते २०३२ या २० वर्षासाठी फक्त २३० पैसे / युनिट आहे. स्वत:ची वीजनिर्मिती वाढविणे, दिर्घ मुदतीचे स्पर्धात्मक करार करणे इ. मार्गाने दरावर पूर्णपणे नियंत्रण आणणे सहज शक्य आहे. पण त्याची गरजच या कंपन्यांना वाटत नाही. त्यासाठी कायदेशीर मार्गाने सक्ती, नियंत्रण, कठोर शिस्त, वीजनिर्मितीचे उद्दिष्ट ठरवून देणे अथवा कमाल खरेदी दरावर बंधन घालणे या सर्व मार्गांचा वापर आजच्या कायद्याच्या चौकटीतही आयोग व सरकार हे दोघेही करु शकतात. पण दुर्दैवाने गेल्या १० वर्षात या दोन्ही यंत्रणा याबाबतीत निष्क्रीय व कुचकामी ठरलेल्या आहेत. वीज कायद्यातील '२४ तास वीज, स्पर्धात्मक दराने वीज, गुणवत्तापूर्ण वीज, ग्राहक हिताचे संरक्षण' या सर्व तरतुदींचे तेरावे आयोग आणि सरकार या दोघानीही घातले आहे.

या परिस्थितीत राज्यातील भारनियमन रोखणे व जनतेला दिलासा देणे शक्य आहे. सध्या वापरात असलेल्या वीजनिर्मिती केंद्रांमधून कमल क्षमतेने वीज निर्मिती करणे व त्यासाठी ठराविक प्रमाणात आयात कोळशाचा वापर करणे, उरण प्रकल्पासाठी पुरेसा गॅस उपलब्ध करुन घेणे व प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविणे, वीजवहन व वितरण गळती व वीजचोऱ्या या विरोधात धडक मोहीम राबविणे, ग्रामीण भागातील सव्वा लाखाहून अधिक ट्रान्सफॉर्मर्सवर कपॅसिटर्स बसविणे, सी.एफ.एल., सोलर हीटर्स, उर्जा लेखापरिक्षण, उर्जा कार्यक्षम उपकरणे यासाठी प्रोत्साहक अनुदान देऊन धडक मोहीम राबविणे, सर्व प्रकारच्या चैनीच्या वीज वापरावर बंदी घालणे इ. सर्व मार्गांनी आजही भारनियमन निम्म्यावर वा त्याहीपेक्षा खाली आणता येईल आणि उपलब्ध वीजेचा पूर्ण क्षमतेने वापर झाल्यामुळे सरासरी वीज पुरवठा खर्चही कमी होईल. पण यासाठी जी इच्छाशक्ती हवी, तिचा दुष्काळ राज्यकर्ते व महावितरणमध्ये आहे आणि परिणाम मात्र जनतेला भोगावे लागत आहेत.

वीज तुटवड्याच्या नावाखाली हजारो मेगॅवॅटच्या नवनवीन प्रकल्पांच्या घोषणा केल्या जात आहेत. विजेची स्वप्ने दाखवून अणू कराराचे समर्थन केले आहे. आज देशातील वीजेमध्ये अणूऊर्जेचा हिस्सा फक्त २.७५% आहे. जाहीर केल्याप्रमाणे इ.स. २००३ पर्यंत ४०,००० मेगॅवॅटचे उद्दिष्ट साध्य झालेच तर हा हिस्सा कमाल १०% होईल. १०% वीजेमुळे १००% प्रश्न सुटतील असा भ्रामक प्रचार हा जनतेच्या भावनांशी खेळण्याचा क्रूर प्रकार आहे. अणूऊर्जा ही महागडी, न परवडणारी धोकादायक आहे असे प्रतिपादन अमेरिकेतीलच जागतिक किर्तीचे पर्यावरण व कृषितज्ञ लेस्टर ब्राउन यांनी केले आहे. यासंदर्भात सखोल व पारदर्शक चर्चा व सहमती न करता केवळ प्रकल्प रेटण्याची मोहीम सुरू आहे. कोकणच्या किनारपट्टीवर किमान २०,००० मेगॅवॅटहून अधिक क्षमतेच्या वीज प्रकरल्पांच्या घोषणा झालेल्या आहेत. भूसंपादनाची सक्ती सुरू झालेली आहे. या सर्व प्रकल्पांचे कोकणातील फळबागांवर होणारे परिणाम, समुद्रातील जलचरांवर होणारे परिणाम, पर्यावरणावर होणारे आघात व या सर्व बाबींचा कोकणाच्या विकासावर व तेथील जनतेच्या भविष्यावर होणारा परिणाम यांचा साकल्याने, सर्व बाजूने विचार न करता विनाशकारी प्रकल्प लादले जात असतील तर अशा सक्तीला विरोध करणे अत्यावश्यक आहे.

आज राज्यातील औद्योगिक वीजेचे दर देशातील अन्य सर्व राज्यांच्या तुलनेने सर्वात जास्त आहेत. त्याच्या परिणामी राज्याचा औद्योगिक विकास ठप्प होणे आता अटळ आहे. भारनियमनामुळे पुणे शहरात १ तासात ६ कोटी रु.चे उत्पादन ठप्प होते. याच हिशोबाने संपूर्ण राज्याचा विचार केला तर वर्षभरात भारनियमनामुळे औद्योगिक उत्पादनाची हानी अंदाजे १ लाख कोटी रु.हून अधिक होते. परिणामी राज्य सरकारचा महसूलही किमान १०,००० कोटी रु.नी बुडतो. शेतीवर आधारीत लोकसंख्या ६५%, पाणी आहे पण वीज नाही म्हणून प्रत्येक तालुक्यात करोडो रु.ची पिके करपून व जळून जात आहेत. त्यांच्या हानीचा हिशेब नाही. पुरेशा वीजेअभावी रोजगार निर्मितीवर होणारा परिणाम, वीजे अभावी कामगारांना मिळणारा अपूरा पगार, त्यांच्या कुटुंबियांचे होणारे हाल, शेतीच्या नुकसानीमुळे शेतमजुरांचे होणारे नुकसान, महिलांचे पाण्यासाठी होणारे हाल, विद्यार्थ्यांचे अभ्यासाला वीज नाही म्हणून होणारे नुकसान या सर्व नुकसानीची गणती कोणत्याच चलनात करता येत नाही. वीज ही अत्यावश्यक पायाभूत सुविधा आहे, सेवा आहे, राबणाऱ्यांच्या व राज्यांच्या आर्थिक विकासाची चावी आहे याचे भान आजच्या राज्यकर्त्यांना व नियोजनकर्त्यांना राहिलेले नाही.

आजच्या परिस्थितीत वीजदर आणि भारनियमन या दोन्हींवर नियंत्रण आणण्यात आयोग व सरकार या दोन्ही यंत्रणा अपयशी झाल्या आहेत. या दोन्ही यंत्रणावर दबाव आणण्याचे, जनहिताचे निर्णय घेण्यास त्यांना भाग पाडण्याचे काम केवळ जनशक्तीच करु शकते ही आमची ठाम धारणा आहे आणि त्यामुळे आयोग आणि सरकार या दोघांवरही अंकुश लावणारे आंदोलन करणे आता तातडीचे झालेले आहे. राज्यातील सर्व क्षेत्रातील ग्राहक संपूर्ण शक्तीनिशी रस्त्यावर व आंदोलनात उतरले पाहिजेत. यासाठी संपूर्ण राज्यभर सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय ग्राहक जागरण मेळावे आयोजित करण्यात येतील व त्यानंतर राज्यस्तरीय सामूहिक आंदोलनात्मक कृति कार्यक्रम सर्वसहमतीने जाहीर केला जाईल. त्याचबरोबर ग्राहक हिताच्या दृष्टीने कायद्यातील तरतूदींचा वापर करुन आयोग व सरकार यांनी जनहिताचे कायदेशीर निर्णय घ्यावेत व राबवावेत यासाठी सर्वोच्च न्यायालयात राज्यातील वीज ग्राहकांच्या वतीने जनहित याचिका दाखल करण्यात येईल. राज्यातील सर्व क्षेत्रातील वीज ग्राहकांनी या रस्त्यावरील व न्यायालयीन लढाईत सर्व शक्तीनिशी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य वीज ग्राहक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. ●

# जनहित याचिका

- रा. वि. भुस्कुटे

साध्या सरळ शब्दात सांगायचे झाले तर जनहित याचिका म्हणजे दहशतवाद, बांधकामामुळे निर्माण झालेला धोका, प्रदुषण, वाहतूक, सुरक्षितता वगैरेच्या बाबतीत सामाजिक हितरक्षणाचे संरक्षण व्हावे म्हणून कोर्टामध्ये दाखल करण्यात आलेला खटला होय. कोणत्याही संविधीमध्ये किंवा कायद्यामध्ये जनहित याचिकेची व्याख्या दिलेली नाही. सामान्य जनतेला ठामपणे काय वाटते हे लक्षात घेऊन काढलेला अन्वयार्थ असा न्यायाधिशांनी याचा अर्थ लावलेला आहे. जरी परंतु 'जनहित' साधने हा या खटल्यांचा एकमेव केंद्रबिंदू असला तरी देखील प्रत्यक्षात खूप अशी विविध क्षेत्रे आहेत की, ज्या बाबतीत जनहित याचिका दाखल करता येतात. उदा. :

• गरीबांच्या मुलभूत मानवी हक्काचा भंग करणे. • सरकारी धोरणाचा मुळ हेतू आणि प्रत्यक्ष व्यवहारात होत असलेली सर्रास चुकीची अंमलबजावणी. • सार्वजनिक सेवा करण्यास नगरपालिका अधिकाऱ्यांना सक्तीने भाग पाडणे. • धार्मिक हक्क किंवा मुलभूत मौलिक हक्काचा भंग करणे.

## जनहित याचिका केव्हा दाखल करता येईल?

जेथे जनहित फार मोठ्या प्रमाणावर बाधीत झालेले असेल तेथेच फक्त जनहित याचिका दाखल करता येईल. शासनाच्या निष्क्रियतेमुळे जेथे केवळ एकाच व्यक्तीचे हितसंबंध बाधीत झालेले असतील तर जनहित याचिका दाखल करता येणार नाही.

खाली नमूद केलेल्या काही बाबींमध्ये जनहित याचिका दाखल करता येईल.

(१) जेथे कारखाना / उद्योगधंद्याच्या विशिष्ट भागामुळे प्रदुषण होते. (२) जेथे कोणत्याही विभागात / रस्त्यावर दिवे नसल्याने दैनंदिन प्रवास करणाऱ्यांची भलतीच गैरसोय होत आहे. (३) जेथे खानावळीत / हॉटेलमध्ये रात्रौ कर्कश आवाजात लाऊडस्पीकर वरून संगीत चालू राहिल्याने ध्वनी प्रदुषण होत आहे. (४) जेथे बांधकाम करणारी कंपनी वृक्षतोड करत असल्याने पर्यावरणीय प्रदुषण होत आहे. (५) राज्य शासनाने अनियंत्रितरित्या निर्णय घेऊन जबरदस्त कर बसवल्याने त्याचा गरीब लोकांवर मोठा परिणाम झाला आहे. (६) तुरूंग सुधारणा, शिक्षा झालेल्या कैद्यांना वेगवेगळे ठेवणे, खटल्यामध्ये दिरंगाई करणे, खटल्यामधील आरोपींना कोर्टाने नेमलेल्या तारखांना हजर न करणे वगैरेबाबत शासनाने पोलिस आणि तुरुंग अधिकाऱ्यांना आदेश न देणे. (७) बाल मजुरी आणि वेठबिगारी नष्ट न करणे म्हणजे चालू ठेवणे किंवा त्याकडे दुर्लक्ष करणे. (८) लैंगिक छळवणुकीमुळे काम करणाऱ्या महिलांच्या हक्कांवर विपरीत परिणाम होत आहे. (९) भ्रष्टाचार आणि गुन्हे यामध्ये गुंतून पडलेल्या उच्च राजकीय अधिकाऱ्यांवर नियंत्रण करणे. (१०) रस्ते, गटारे यांची देखभाल करुन ती सुस्थितीत ठेवणे. (११) वाहतुकीच्या समस्या निर्माण होऊ नयेत म्हणून रस्त्यावर लावण्यात आलेले मोठमोठे फलक काढून टाकणे. (१२) पत्त्यावर पोष्टानी चलन पाठविण्याच्या दिल्ली वाहतूक पोलिसांच्या पद्धतीचा गैरवापर केला जात असल्याने ही पद्धत थांबवण्यात यावी म्हणून अलिकडे जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

## जनहित याचिका कोण दाखल करु शकतो?

(१) इतरांसमवेत ज्या व्यक्तीचे हितसंबंध सरळ सरळ बाधीत झालेले आहेत की ज्यामुळे त्यांच्या मुलभूत हक्कांचा भंग झालेला आहे ती व्यक्ती सुरुवातीला असे मुकादमे दाखल करत असे. (२) अलिकडे त्यात बदल झालेला आहे आणि आता कोणतीही समाजासाठी झटणारी व्यक्ती, ज्या व्यक्ती समुहाचे हक्क बाधीत झाले आहेत त्यांच्यावतीने जनहित याचिका दाखल करु शकतात. (३) जनहित याचिका दाखल करणाऱ्या व्यक्तीचे स्वत:चे थेट हितसंबंध या जनहित याचिकेमध्ये पाहिजेतच अशी काही आवश्यकता नाही. उदा. मध्यप्रदेशात एखाद्या मजुरी पिळवणूक होत असेल तर मुंबईमधील अगर अन्य ठिकाणाची व्यक्ती जनहित याचिका दाखल करु शकेल.

तामिळनाडूमधील फटाक्याच्या कारखान्यातून बालमजुरांना कामाला जुंपण्यात येते. म्हणून कुठल्याही ठिकाणची वकिली करणारा फटाक्याचे कारखान्याविरुद्ध जनहित याचिका दाखल करु शकेल.

उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या बदल्या करण्याच्या राज्य शासनाचे धोरणाला आव्हान देणारी, त्याचप्रमाणे केलेल्या गुन्ह्याबद्दल होऊ शकणाऱ्या शिक्षेच्या कालावधीपेक्षाही अधिक वर्षे कारावास भोगलेल्या ८० कच्च्या कैद्यांची सुटका करण्यात यावी म्हणून एका वकिलाने जनहित याचिका दाखल केली.

तेव्हा यावरुन हे अगदी स्पष्ट होते की, बाधित व्यक्ती समुहाच्या वतीने कोणतीही व्यक्ती जनहित याचिका दाखल करु शकते. तथापि प्रत्येक दाव्यातील वस्तुस्थितीवर त्याला परवानगी द्यावयाची की नाही हे अवलंबून राहणार आहे.

## कोणाच्या विरुद्ध जनहित याचिका दाखल करता येईल?

(१) राज्य सरकार, केंद्र सरकार, नगरपालिका प्राधिकरण यांचेविरुद्ध जनहित याचिका दाखल करता येईल. कोणत्याही खाजगी व्यक्तीविरुद्ध दाखल करता येणार नाही. (२) परंतु बाधित राज्य प्रशासनाला पक्षकार केल्यानंतर खाजगी व्यक्तीला प्रतिवादी बनवता येईल.

उदा. दिल्लीमधील एक खाजगी फॅक्टरी सभोवतालची हवा प्रदुषित करत असेल तर जवळ राहणारे लोक जनहित याचिकेखाली नमूद केलेल्याविरुद्ध जनहित याचिका दाखल करु शकतील.

• दिल्ली सरकार, • राज्य प्रदुषण नियंत्रण बोर्ड, • आणखी खाजगी कारखान्याविरुद्ध देखील

परंतु खाजगी व्यक्ती विरुद्ध फक्त जनहित याचिका कदापिही दाखल करता येत नाही हे अगदी सुस्पष्ट आहे. संबंधित राज्य सरकार किंवा / आणि राज्याचे प्राधिकरणाला पक्षकार बनावेत लागेल. •

*With Best Compliments From :*

**Su-Kam**
**HOME UPS SYSTEMS**
The Latest Technology, The Largest Range

CE CERTIFIED

**The Latest Technology, The Largest Range**
**Global Certifications**

**Authorised Dealer**

## JENN BATTERY SALES & SERVICE

**Shop No. 5, Parikh Commercial Centre, Agashi Road,**
**Bolinj, Virar (West)**
**Shop No. 5, Taneya Stephan REsidency, Nallasopara (w).**

### Pure Sine Wave Home UPS Systems

World's most advanced sine wave technology based, this Home UPS systems provides 100% pure power which runs all appliances without the irritating-humming sound.

### Feature Highlights

- Fuzzy Logic Control : Advanced technology which protects battery, reduces frequency of water topping and enhances battery life.
- Saves 40% electricity bill as compared to square wave inverter.
- Incorporates smart overload sensing and short-circuit protection with auto reset.
- Ideal for sophisticated electronic equipment like new generation DVD players, monitors, printer, scanner, in addition to tube lights, fans and room coolers.
- Negligible switchover time : for the computer to run uninterrupted during power cuts, without rebooting.
- Space Saver - ideal for modern day households.
- Choice of various aesthetically designed models.
- Option of castor wheel mounted trolley for easy movement.
- Suitable for Personal Computers, Printers, Fax machines, Fans, Tube lights and Television.

# नवजन्म ग्रुप ( अे. अे. ) : १६ वर्षाची वाटचाल

**– पायस मच्याडो**, नंदाखाल

अल्कोहॉलिक ॲनॉनिमस ही मद्याच्या पूर्ण आहारी गेलेल्या बांधवांसाठी जगभर काम करणारी सेवाभावी संघटना आहे. संपूर्ण जगभर ह्या संघटनेचे बांधव ज्यांना ह्या व्यसनापासून मुक्ती मिळाली आहे ते मद्याच्या मोहजालात अडकलेल्या बांधवांची सुटका करण्यासाठी धडपडत आहेत. अशा बांधवांना ह्या राक्षसी घातक व्यसनाविषयी प्रबोधन करुन त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना धीर देत आहे. 'आम्ही जे मनाने व शरीराने निराशग्रस्त आहोत परंतु परमेश्वरी कृपेने आम्ही आज त्या व्यसनांपासून दूर आहोत. तुम्हीसुद्धा असाच अनुभव घेऊ शकता' असा संदेश ही संघटना सर्वत्र देत आहे.

अशा ह्या सुंदर ध्येय असलेल्या नवजन्म ग्रुप अे. अे. नंदाखाल संघटनेचा जन्म १६ वर्षापूर्वी नंदाखाल येथे झाला. त्यावेळचे नंदाखालचे प्रमुख धर्मगुरू असलेले फा. मायकल जी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली नंदाखाल व आजूबाजूच्या परिसरातील बांधवांनी जे ह्या आजारापासून मुक्ततेचा आनंद घेत आहेत त्यांनी ही संघटना सुरू केली. त्यांनी वसईत सभेला जाण्यापेक्षा आपल्या भागातच ही संघटना नवजन्म ग्रुप या नावाने चालू केली व उत्तर वसई परिसरातील चर्चमध्ये चालणारी पहिलीच संघटना ठरली. फा. मायकल जी. ह्यांच्या सहकार्याने व सिल्वेस्टर मच्याडो, बावतीस डिमोन्ते, कॅजिटन मच्याडो, किशोर अशा अनेक बांधवांच्या पुढाकाराने ह्या संघटनेला चांगला प्रतिसाद मिळू लागला. नवीन बांधवांना मुक्तीचा संदेश मिळू लागला. ह्या घातक व्यसनाधिन आजाराची माहिती व प्रबोधन समाजामध्ये होऊ लागले. ह्या आजाराने त्रस्त झालेल्या बांधवांच्या घरी व नातेवाईकांमध्ये संघटनेचे सभासद भेट देऊ लागले व त्यांना एक आश्वासक आधार मिळू लागला. आत्मबलाच्या निर्धारावर व आपल्यापेक्षा श्रेष्ठतर अशा शक्तीपुढे लीन झालेले बांधव गेल्या वीस वर्षापासून ह्या मद्यपाशातून दूर झाले आहेत व इतरांना नवजीवनाचा मार्ग दिसावा म्हणून धडपडत आहेत.

दर शनिवारी संध्या. ६.३० वा. नंदाखालच्या संत जोसेफ हायस्कूलच्या वर्गात ही सभा असते. व्यसनावर विजय मिळविण्यासाठी नवीन बांधवांना प्रबोधन केले जाते. मद्यपि जीवनातल्या कटू आठवणीवर चर्चा केली जाते व नवीन बांधवांना वेळीच सावध केले जाते. ह्या सभेला बोईसर, पालघर तसेच मुंबईतील बांधव येत असतात. त्यामध्ये अनेक व्यवसायात असणारे तसेच वकील, डॉक्टर्स अशा मोठ्या हुद्द्यावर असणारे अधिकारी ज्यांना ह्या व्यसनी आजाराने ग्रासले होते असे बांधव येऊन सुंदर आध्यात्मिक प्रबोधन करत आहेत.

आपल्या वसईतसुद्धा आज अनेक ठिकाणी संघटनेचे बांधव सभेद्वारे अशाप्रकारचे प्रबोधन निरनिराळ्या ठिकाणी करत आहेत. अनेक मद्यपि बांधवांनी ह्या प्रबोधनाला उपस्थित राहून आपल्या जीवनाचा कायापालट केला आहे. मद्यपि बांधवांसाठी करीत असलेले कार्य हे कर्तव्यकर्म आहे ह्या जाणिवेतून ही संघटना चालविली जाते. मद्यपिडीत एक "आजारी" माणूस आहे हा एक महत्वाचा संदेश ह्या संघटनेतर्फे दिला जातो. जशी आपण एखाद्या आजारी माणसाची सेवा करतो, त्याची निगा राखतो तशाच प्रकारची वागणूक समाजाने व विशेषत: मद्यपिडीत बांधवांच्या घरातील लोकांनी त्याला द्यावी, त्याचा तिरस्कार न करता परत समाजप्रवाहात कसे आणता येईल ह्याचा प्रयत्न करावा व त्यासाठी ह्या संघटनेची मदत घ्यावी किंबहुना त्यासाठी ह्या संघटनेची निर्मिती झाली आहे. ह्या सेवाभावी संघटनेच्या सभासदांसाठी कोणत्याही प्रकारची वर्गणी नाही व तशा प्रकारची मागणीही केली जात नाही. कोणत्याही धर्माशी ही संघटना जोडलेली नाही. मद्यपान स्वत:हून थांबविण्याची प्रामाणिक इच्छा हीच एक महत्वाची अट आहे.

आपल्या घरात, आजूबाजूला जर मद्यपी 'आजारी' बांधव असतील तर ह्या संघटनेकडे कोणत्याही ठिकाणी आपण संपर्क साधावा किंवा व्यक्तिश: भेटून आपली समस्या कळवा. ही संघटना आपणाला सर्वतोपरी मदत करील. ह्या संघटनेच्या कार्याचा व कार्यपद्धतीचा, भूमिकेचा आणि तत्वज्ञानाचा परिचय समाजाला व्हावा व जे मद्यासक्त असतील त्यांना नवजीवनाचा मार्ग दिसावा ह्याच हेतूने ही संघटना काम करत आहे. म. गांधी म्हणतात त्याप्रमाणे "आपल्याला प्रत्येक माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसावयाचे आहेत. पण प्राप्त परिस्थितीत एका माणसाचे अश्रू पुसण्यात तरी आपल्याला यश आले तरी ते महान कार्यच होय." नवजन्म ग्रुप अे. अे. नंदाखालची संघटना हेच कार्य करीत आहे. त्यांच्या कार्याचे क्षितिज वाढत जावो व मद्यमुक्तीचा संदेश झंझावातासारखा पसरत जावो हीच त्यांना १६ व्या वर्धापन दिनानिमित्त निर्भयतर्फे शुभेच्छा! ●


**With Best Compliments From :**

**S. F. FURNITURE WORKS**

**INTERIOR DECORATORS**

Nandakhal - Bavkhal (Vatar),

P.O. Agashi, Tal. Vasai,

Pin - 401 301

Tel. : 2588418

Mobile : 9881827556

**FRANCIS LOPES**

# निर्मळ मनाचे प्रधान मास्तर

**- उदय सामंत, वसई**

प्रा. ग. प्र. प्रधानांनी जगाचा निरोप घेतल्याची ब्रेकींग न्यूज टि.व्ही. पर ऐकली आणि चमकदार डोळ्यांवर चढवलेला जाडसर भिंगाचा चष्मा, पायात साधी चप्पल आणि पांढरा शुभ्र खादीचा कुर्ता-पायजमा घातलेले प्रधान मास्तर डोळ्यासमोर आले. तत्ववेत्ता, मार्गदर्शक, सुसंस्कृत राजकारणी, साहित्यिक, स्वातंत्र्यसैनिक अशी त्यांच्या विविध रुपांच्या आठवणी जाग्या झाल्या.

तुळींजला क्रिकेटपटू बनसोडच्या वाडीत प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रधान मास्तर आले होते. त्यावेळी त्यांनी देशातील राजकीय व सामाजिक परिस्थिती सांगून समाजवादी कार्यकर्त्यांनी कशा प्रकारे कार्य करावयास पाहिजे हे ज्या सहजतेने समजावून सांगितले, कार्यकर्त्यांचे प्रश्न लक्षपूर्वीक ऐकून घेऊन त्यांनी दिलेल्या उत्तराने कार्यकर्त्यांचे झालेले समाधान, दिवसभरातील त्यांचं वागणं तरुणपणी माझ्या मनावर कायमचं कोरलं गेलं. त्यानंतर वसईत ते कधी जाहीर सभेला, कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला तर कधी फक्त गप्पा मारण्यासाठी आले. त्यावेळी त्यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे ज्ञानात भर पडली. त्यांच्या राजकारणातील सभ्यतेने बरेच काही शिकवले. गप्पा मारताना त्यांनी सांगितलेले किस्से आणि त्यांचे निरागस हास्य आनंद देऊन गेले. त्यांची आमदार म्हणून १८ वर्षाची कारकिर्द, काही वर्षे विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी केलेली कामगिरी, लोकप्रतिनिधी कसा असावा ह्याचा आदर्श सर्वांपुढे ठवेणारी होती. समाजवादी चळवळीतील कार्यकर्ते आणि व्यासंगी लेखक या दोन्ही बाजू त्यांनी यशस्वीरित्या सांभाळल्या. त्यांची साहित्यसंपदा मोठी होती. प्राध्यापक पूर्णवेळ समाजवादी कार्यकर्ता, आमदार, साने गुरूजींच्या साधनाचे संपादकत्वाची जबाबदारी पार पाडताना त्यांनी आपला ठसा उमटवला. कर्मयागी प्रधान मास्तरांच्या किती पैलूविषयी बोलावयाचे. स्वत:चा बंगला त्यांनी साधना मासिकासाठी दिला आणि स्वत: साने गुरूजी रुग्णालयात एक खोली घेऊन राहिले. आपले स्वत:चे आहे तेसुद्धा समाजाला देणारे ते संत पुरुष होते.

त्यांच्याच आत्मनिवेदनात ते म्हणतात, "विविध क्षेत्रामध्ये काम करताना मानवी मनाचे मला जे दर्शन घडले त्याचे सम्यक वर्णन करण्याचे सामर्थ्य माझ्यात नाही. मला सामान्यांचे असामान्यत्व दिसले. तेव्हा मी स्तिमीत झालो. अनेक बाबतीत मोठ्या असणाऱ्या माणसांच्या मनातील थिटेपणा काही प्रसंगात पाहून मी व्यथीत झालो. कलंदर वृत्तीच्या काही जणांच्या सहवासात मला माझ्या सावधपणे जगण्याच्या वृत्तीची लाज वाटली. बुद्धीची विलक्षण झेप असणाऱ्या काही माणसांची आत्मकेंद्रीत आणि आत्मसंतुष्ट वृत्ती पाहून माझे मन उद्विग्न झाले. संगीत, चित्रकला, नृत्य आदि ललीत कलांचा रसिकतेने आस्वाद घेताना बेहोश होणारे माझे मित्र पाहून माझी संवेदना किती उणी आहे हे मला जाणवले आणि मन उदास झाले. मोहाच्या काही प्रसंगी झालेली माझ्या मनाची तडफड आणि काही प्रसंगातील दुर्बलता आठवली की आताही माझे मन खिन्न होते. अनेक तऱ्हेचे अनुभव आले आणि तरीही जीवन संपूर्णपणे कळले असे वाटत नाही.

समाज जीवनातील संघर्षाचे स्वरुप, जनमानतील वादळे मला बरीचशी समजतात. परंतु मानवी मनातील भावनांचे नर्तन आणि वासनांचे तांडव मला काहीसे अनाकलनीय वाटते. आपण अंधारात तर चाचपडत नाही ना असे वाटते. त्याचबरोबर लहान मुलांचे निरागस हास्य, फुलांचा मंद सुगंध ह्यांच्यामुळे अनेकदा कोवळ्या सुर्यकिरणांचा स्पर्श माझ्या मनाला झाला त्या क्षणी तरी माझ्या मनातील अहंकार, अभिनिवेश ह्यांचा लोप झाला.

राजकारणात काम करताना लागणारा अभिनिवेश माझ्याजवळ नाही. परंतु जे सत्य मला पटते त्या बद्दलची माझी भावना उत्कट असते व असत्याशी मी कधीच तडजोड करीत नाही. मला सत्य समजते पण मी ते कटुतेने कधी मांडत नाही. माझी भूमिका मी सतत स्पष्टपणे मांडली आहे. सत्य सांगताना गुळमुळीतपणे बोलणे ही सत्याची प्रतारणा आहे. मी अशी प्रतारणा कधी केली नाही. मी चुकलो असेन परंतु माझा हेतु कधी दुसऱ्यावर अन्याय करण्याचा नसे."

निर्मळ मनाच्या माणासचे हे आत्मनिवेदन. असा सुसंस्कृत माणून नेहमीच आपल्या सोबत रहावा असे आपल्याला वाटत असते पण मास्तरांचे वय ८८ वर्षे होते. समाज संवेदनाहीन होत असताना आणि माणूसकी हरवत चाललेली असताना, नितिमत्तेचा लोप होत असताना साने गुरूजींच्या धडपडणाऱ्या मुलांपैकी एक असलेल्या माणसासारखं जगणाऱ्या प्रधान मास्तरांना जगण्यासाठी ह्यापुढे त्रासच झाला असता असा विचार मनात येतो.

प्रधान मास्तरांना निर्भय आंदोलनतर्फे श्रद्धांजली. ●


**पावसाळी सहल**

**सह्याद्रीच्या कुशीतील निसर्ग सौंदर्य अनुभवण्यासाठी चला**

**लोणावळा - खंडाळा**

**दि. ३१ जुलै ते १ ऑगस्ट २०१०**

**प्रवास, निवास व जेवणासहित**

**खर्च रु. १,६००/- प्रौढ**

**रु. १,३००/- मुले ( वय ५ ते १२ वर्षे )**

**तसेच फक्त पुरुषांसाठी**

**दि. ७ व ८ ऑगस्ट २०१०**

**संपर्क : तुस्कानो टुर्स**

**स्नेहगंधा, नंदाखाल, घोसाळी**

**न्यूमन तुस्कानो**

**मोबा. : ९२२२३३७०५१, २५८७७५१**

# खेळासाठी वीज देण्याऐवजी रात्रीचे भारनियमन कमी करा

## जनता दल, निर्भय जन मंच, वीज ग्राहक संघटनेची वीज नियामक आयोगाकडे मागणी

महावितरण कंपनीने आधी मुळा-प्रवरा को-ऑप. इलेक्ट्रीसिटी सोसायटीकडे थकलेली २५०० कोटीची थकबाकी वसूल करावी, ज्या वीज अधिकाऱ्यांनी इतकी वर्षे मोठी थकबाकी होऊ दिली त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. तोपर्यंत वीज दरवाढ मागणीचा प्रस्ताव फेटाळून लावावा व किमान तीन वर्षे आताचा वीज दर स्थिर ठेवावा. रात्रीचे भारनियमन रद्द करावे असा घणाघाती युक्तीवाद निर्भय जन मंचचे कार्याध्यक्ष व वसई वीज ग्राहक संघटनेचे अध्यक्ष जॉन परेरा आणि वसई तालुका जनता दलाचे चिटणीस पायस मच्याडो यांनी वीज नियामक आयोगासमोर महावितरण कंपनीच्या दरवाढ प्रस्तावाविरुद्ध युक्तिवाद करताना केला. समोर बसलेल्या बड्या वीज अधिकाऱ्यांना परेरा यांनी थेट टारगेट केल्याने त्यांची मोठी अडचण झाली.

वीज वितरण कंपनीने ४१६६ कोटी रुपये दरवाढीची मागणी करणारा प्रस्ताव वीज नियामक आयोगासमोर दाखल केला आहे. या दरवाढीस महाराष्ट्र प्रदेश जनता दलाचे प्रधान महासचिव प्रताप होगाडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर लाखो हरकती, सूचना दाखल करण्यात आल्या. या मोहिमेचा भाग म्हणून वसई तालुक्यातून हरकती गोळा करण्यात आल्या व त्या सर्व वेळेत दाखल करण्यात आल्या. या हरकतीवर २२ मे २०१० रोजी आयोगासमोर नवी मुंबईत सुनावणी झाली. विशेष म्हणजे जनतेच्या जीवनाशी निगडीत असलेल्या या प्रश्नासाठी जनता दल, निर्भय जन मंच, वसई तालुका वीज ग्राहक संघटना वगळता वसईतून अन्य एकाही राजकीय पक्ष किंवा संघटनेचा एकही नेता यावेळी हजर नव्हता.

आपल्या घणाघाती युक्तीवादात जॉन परेरा यांनी राज्य शासन व अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. एकसारखी वीज दरवाढ करणाऱ्या सरकारने निवडणूकीआधी मात्र वीज दरवाढ रोखून धरली होती. आता सत्ता आल्यावर ४१६६ कोटी वसूल करण्यासाठी ३०-३५ टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव आयोगासमोर आणला आहे. मुळा-प्रवराची २५०० कोटीची थकबाकी वसूल झाली असती तर त्या पैशातून वीज उत्पादन वाढवता आले असते व आज किमान ४२०० मॅगावॅट वीजेचा तुटवडा आहे तो कमी करता आला असता व भारनियमनापासून जनतेला मुक्ती मिळाली असती. पण राजकीय हातमिळवणी असल्यामुळे महावितरण कंपनी, वीज नियामक आयोग आणि राज्य शासन सारेच गप्प बसतात आणि आता हाताबाहेर गेल्यावर जनतेला वेठीस धरण्यासाठी अशाप्रकारे दरवाढीचा प्रस्ताव आणतात असा आरोप परेरा यांनी आयोगासमोर बोलताना केला.

यावेळी जनता दलाचे तालुका सचिव पायस मच्याडो यांनीही आयोगासमोर युक्तीवाद केला. ते म्हणाले आयपीएल सामन्यासाठी वीज देऊन रात्रीचे दिवस करण्यात येतात. पण त्याचवेळेला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी वीज मिळत नसते. मृत्यूशी संघर्ष करणाऱ्या रुग्णांना जगविण्यासाठी रुग्णालयांना जनरेटर लावून आयसी युनिट चालवावी लागतात. अधिकारी एसीमध्ये बसतात आणि शेतकरी विजेशिवाय शेतीपंप चालत नाही म्हणून कपाळाला हात मारुन आकाशाकडे बघत बसतात. समतेवर भर देणाऱ्या आमच्या राजघटनेचे उल्लंघन वीज महावितरण कंपनी उघडपणे करत आहे असा आरोप पायस मच्याडो यांनी केला.

आयोगापुढे सुनावणी देण्यासाठी विविध संघटना व विविध कंपन्या व वीज ग्राहक संघटनासह प्रयास, मुंबई ग्राहक पंचायत, औद्योगिक संघटना व अनेक कंपन्या यांनी भाग घेतला. जनता दलाचे प्रधान महासचिव प्रताप होगाडे यांनी पुणे व अन्य ठिकाणी वीज ग्राहकांच्या वतीने जोरदार युक्तीवाद केला व आयोगासमोर महावितरण कंपनी व राज्य शासनाचे वाभाडे काढले. श्री. प्रताप होगाडे आदी थोरामोठ्यांच्या उपस्थितीत जॉन परेरा व पायस मच्याडो यांनी वसईकरांचा आवाज आयोगासमोर बुलंदपणे उठवला त्याबद्दल त्यांचे वसईकर जनतेच्या वतीने हार्दीक अभिनंदन. •

---

# कॅन्सर चिकित्सा शिबीरे

## ११ जुलै - आगाशी, १८ जुलै - निर्मळ व २५ जुलै - नंदाखाल

इंडियन कॅन्सर सोसायटीच्या सौजन्याने निर्भय जन मंचद्वारा एकूण तीन कॅन्सर चिकित्सा शिबीराचे आयोजन केले आहे. नवीन एक्सरे मशीनद्वारे शरीराची तपासणी व अन्य तपासण्या होतील. याचा लाभ स्त्री-पुरुषांनी घेऊन आपली तपासणी करुन घ्यावी.

रविवार दि. ११ जुलै २०१० रोजी सेंट तेरेजा हॉस्पिटल, आगाशी
संपर्क : प्रा. ट्रिजा परेरा - ९९७५७८२६६८
श्री. एलायस लोपीस, कैतान लोपीस

रविवार १८ जुलै २०१० रोजी होली क्रॉस हायस्कूल, निर्मळ
संपर्क : श्री. संजय डाबरे - ९८२०१८४२७९
श्री. एलायस डाबरे - ९८६७३१४४४२
श्री. लुईस गोम्स - ८९८३३६१३८४
श्री. टोनी डाबरे - ९७६४८३०७७७

रविवार २५ जुलै २०१० रोजी सेंट झेविअर हॉस्पिटल, नंदाखाल
संपर्क : जॉन परेरा - ९००४७०८१८२
पायस मच्याडो - ९३२२१४०४९०, कॅलीस ब्रास - ९१५८२२३५३७

**तपासणी फी रु. ३००/- भरुन नांवे नोंदवा.**

**वेळ :** विभागवार भारनियमनानुसार कळविली जाईल.

### संत जोजेफ पतपेढी निवडणूक

# जनता दल प्रणित सहकार पॅनल १००% विजयी

**वसई :** वसई तालुक्यातील अग्रगण्य संत जोजेफ पतपेढीच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीत जनता दल प्रणित सहकार पॅनलला १००% यश मिळाले असून १३ पैकी १३ जागा मोठ्या मताधिक्क्याने जिंकल्या आहेत. तर जनआंदोलन प्रणित परिवर्तन पॅनलला एकही जागा मिळाली नाही. विद्यमान चेअरमन व्हेलेरियन घोन्सालविस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवडणूकीत झालेल्या मतदानापैकी सहकार पॅनलला ७५% ते ८०% मते मिळाली तर परिवर्तन पॅनलला २०% च्या आसपास मते मिळाली. विशेष म्हणजे या पतपेढीच्या निवडणूकीत अतिशय खालच्या पातळीवर उतरून सहकार पॅनलविरोधात पत्रकबाजी व प्रचार करण्यात आला. तरीही सुज्ञ मतदारांनी व्हेलेरियन घोन्सालविस यांच्या सहकार पॅनलला मोठ्या मताधिक्क्याने निवडून दिले.

| सहकार पॅनल | मिळालेली मते | परिवर्तन पॅनल | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| श्री. व्हेलेरियन घोन्सालविस | ३२८८ | श्री. फेलिक्स घोन्सालविस | १०६७ |
| श्री. विल्यम करवालो | ३२१९ | श्री. जोजेफ कचपिले | १०५४ |
| श्री. रोमन तपेली | ३४६८ | श्री. रॉकी घोन्सालविस | १०७४ |
| श्री. संजय फलकांव | ३४२६ | श्री. पिटर डायस | १०७७ |
| श्री. पॅट्रीक फुर्ट्याडो | ३४४९ | श्री. लिनस डिकुना | १०६७ |
| श्री. ग्रेगरी मच्याडो | ३४४४ | श्री. डेनिस डिसिल्वा | १०३४ |
| श्री. ऑस्टीन रिबेलो | ३४०५ | श्री. विल्यम फुर्ट्याडो | ११२५ |
| श्री. बॉनी रॉड्रीग्ज | ३३७३ | श्री. जनार्दन लोयली | ९५४ |
| सौ. तेरेजा फलकांव | ३५८६ | सौ. फातिमा घोन्सालविस | १२१६ |
| श्री. प्रकाश पाटील | ३६१७ | श्री. संजय वर्तक | ११८४ |
| श्री. सावरॉक मस्तान | ३६८८ | श्री. रमेश घुटे | १११९ |
| श्री. चंद्रकांत घुटूकडे | ३९३९ | श्री. चिंतामण धोंडेकर | ११६६ |
| श्री. प्रदीप खरपडे | ३५२४ | श्री. सेल्सस कुटीनो | १२८२ |

९२ कोटीच्या ठेवी असलेली ही संस्था विद्यमान संचालकांनी प्रगती पथावर आणली आहे. त्यामुळे जन आंदोलनाच्या बॅट निशाणीचा व नेत्यांचा प्रभाव मतदारांवर पडू शकला नाही. त्यांनी केलेल्या गलिच्छ प्रचारालाही लोकांनी दाद दिली नाही. ●

# शिक्षणपद्धती आणि आपण

**- सुमुख देशपांडे**, बदलापूर

एकंदर समाजव्यवस्था, भ्रष्टाचार यावर आजपर्यंत भरपूर भाष्ये झाली पण मुळात समाज घडविणारा एक प्रमुख घटक आणि तो म्हणजे आपली शिक्षणपद्धती यावर फारशी भाष्यही होत नाहीत आणि प्रमुख म्हणजे यावर सुचनाही केल्या जात नाहीत.

बालमानसशास्त्र मुलांवर ताण पडतो आहे असे वारंवार सांगत आले आहे. पण हा ताण मुळात कशाने पडतो याची विचारणा केली असता, बहुधा पालकांच्या अवास्तव अपेक्षांकडे बोट दाखवले जाते. जीवघेणी स्पर्धा हेही याचे प्रमुख कारण समजले जाते आणि याचा एक अंतिम निष्कर्ष म्हणजे चुकीची शिक्षणपद्धती. बरं, चुकीची शिक्षणपद्धती म्हणजे नेमके काय? मुलांना मार्काच्या पारड्यात मोजणे? किंवा मुलांना आवडत नसलेल्या एखाद्या विषयात निपुणता असण्याची अवाजवी अपेक्षा करणे? शिक्षणपद्धती चुकीची आहे या टीकेची उकल मुळात व्यवस्थित होणे गरजेचे आहे. गणित आवडत नाही म्हणून पाढे पाठ करणे बंद करुन चालणार नाही किंवा नकाशे वाचायला आवडत नाही म्हणून भूगोल शिकणं बंद करुन चालणार नाही. कारण व्यवहार ज्ञानासाठी या सर्व गोष्टी निकडीच्या आहेत.

माझ्या मते भारतीय शिक्षणपद्धतीत सर्व विषयांना हात लावून मुलांना पायाभूत ज्ञान देण्याची क्षमता आहे हे आपल्याला विसरुन चालणार नाही. शिक्षण आपल्याला समग्र, सारासार विचार करायले शिकवते. याबरोबर शिक्षण आपल्याला रोजीरोटी सुद्धा मिळवून देईल ही अपेक्षा अवास्तव आहे. M.B.A. केल्यानंतर तुम्ही यशस्वी उद्योजक व्हालच याची काही खात्री देता येत नाही. एखाद्या क्षेत्रातली आपली आवड हेच मुळात शिक्षणाचे कारण असले पाहिजे. बरेच शिक्षणतज्ज्ञ शिक्षणपद्धतीकडे बोट दाखवून तुर्तास प्रश्न मार्गी लावू पाहतात. मुळात ते कारणच नाही असे मला वाटते.

आपल्याला कुठल्या क्षेत्राची गोडी आहे याचाच मुळात विचार केला जात नाही. पुरेसे आत्मपरिक्षण होतच नाही. गणितात चांगले गुण मिळतात म्हणून एखाद्यानं अभियंता व्हावे असे सुचवणे चुकीचे आहे. गणित चांगले आहे हा गुण एखाद्याला गणिताचा उत्तम शिक्षकही बनवू शकतो. त्याने अभियंताच व्हायला हवे असे क्रमप्राप्त नाही.

शिक्षणपद्धती ही एका रात्रीत बदलण्याची गोष्ट नाही. किंबहुना आपल्याकडची नेते मंडळी ते ही करु शकतात. असो. पण सांगायचा मुद्दा असा की आत्मपरीक्षण एका रात्रीतही बऱ्याच गोष्टी बदलू शकते. त्यामुळे शिक्षणपद्धती बदला हा डंका वाजविणाऱ्यांनी विद्यार्थ्यांना आत्मपरिक्षण शिकवावे. मार्कामुळे ताण वाढतो म्हणून मार्क जास्त मिळवून देणारी शिक्षणपद्धती अवलंबा अशी विचारसरणी असणारे लोकही आपल्याकडे आहेत.

आपला व्यवसाय शिक्षणपद्धतीने दिलेल्या गुणांवर नसून आपल्या आत्मपरिक्षण आणि कुवतीवर अवलंबून असावा. ●

# मॉन्सि. फ्रान्सिस कोरीया : समृद्ध विचाराची सत्तरी

वसई धर्मप्रांतातील विचारवंत धर्मगुरू आणि चर्चसाठी महत्वाच्या जबाबदाऱ्या निभावलेले जेष्ठ धर्मगुरू मॉन्सि. फ्रान्सिस कोरिया यांच्या वयाची ७० वर्षे नुकताच पूर्ण झाली. एम.ए. बी.एड. पदवीधर असलेले मॉन्सि. कोरिया यांची नुकताच 'सुवार्ता' मासिकाचे संपादक म्हणून नियुक्ती झाली आहे.

मॉन्सि. कोरिया 'शिक्षण विचार', 'ख्रिस्तवीर', 'सोड्यालिटी समाचार' या मराठी पत्राचेही सहसंपादक आहेत. विपूल विचारधन असलेल्या फा. कोरिया यांनी अनेक पुस्तके लिहिली असून मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. ''भारताचे पहिले कार्डिनल'' हे स्व. कार्डिनल ग्रेशस यांच्या जीवनावर आधारीत पुस्तक १९७१ साली लिहून मराठी वाचकांना त्यांची ओळख फा. कोरीया यांनी करुन दिली. प्रखर राष्ट्रप्रेमी कार्डिनल व्हेलेरियन ग्रेशस यांचे ते स्वीय सचिव होते. मुळात संशोधक प्रकृती असलेल्या फा. कोरिया यांनी 'सामवेदी बोलीभाषा व गीते' ही पुस्तके जेष्ठ समाजसेवक बावतीस डाबरे आणि पॉल गुरूजी यांच्या सहाय्याने लिहून उत्तर वसईतील ख्रिस्ती सामवेदी समाजाच्या बोलीभाषेला साहित्यात स्थान मिळवून दिले. 'वांद्र्याची मोतमावली', 'मधाच्या घागरी', 'सप्तर्षी', 'वसईचा किल्ला', 'संत फ्रान्सिस झेविअर', 'कथा तारणाची', 'गव्हाचा दाणा', 'अमृत तुषार', 'मोरपिशी स्पर्श', 'महंताच्या सहवासात', 'महाराष्ट्र १९७८', 'सामवेदी ख्रिस्ती समाज', 'बायबलमधील स्त्रिया', 'महाराष्ट्र २००१', 'केल्याने देशाटन इस्त्राएल', 'दैनंदिन कौटुंबिक प्रार्थना' 'Heritage of Mount Mary Bandra', 'St. Bonaventure', 'Mother Church in Mother India', 'Missionery Herald of India' अशी धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक तत्वज्ञान समृद्ध पुस्तके लिहून मराठी, इंग्रजी साहित्यात मोलाची भर घातली आहे. राज्यशासनाचे त्यांना दोन पुरस्कार लाभले आहेत. धर्मगुरूला ते प्रथमच मिळाले असावेत. रेडिओ, टी.व्हीवर त्यांची भाषणे, चर्चासत्रे लोकांना ऐकावयास मिळतात. मराठी, इंग्रजी माध्यमातूनही त्यांचे साहित्य प्रसिद्ध होते.

फा. कोरिया १९६७ साली धर्मगुरू झाले. काही वर्षे ते 'सुवार्ता' मासिकाचे स्व. फा. आब्रिओ यांच्या समवेत सहसंपादक होते. वसई-मुंबईतील अनेक चर्चमध्ये त्यांनी काम केले. विकर जनरल म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. मुंबई धर्मप्रांताच्या मालमत्तेविषयक विभागाचे संचालकपद कुशलतेने पार पाडले. वसई धर्मप्रांताचे ते विकर जनरल होते. वास्तविक त्यांना गुजरात मिशनमध्ये काम करायचे होते. तशी नेमणूकही झाली होती पण त्यांच्या कर्तृत्वाला नवे वळण मिळाले. त्यांना मुंबई सरधर्मप्रांतात काम करावे लागले. त्याच त्यांनी चमकदार कार्य केले. निर्भय परिवाराच्या शुभेच्छा! ●

# माणसांची समान प्रतिष्ठा जपणे ही ख्रिस्तसभेची भूमिका - आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो

**नंदाखाल -** (प्रतिनिधी) समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करणे हाच ख्रिस्ती तत्वाचा मुळ गाभा आहे. प्रत्येक माणसात ईश्वराची प्रतिमा असल्याने त्याची समान प्रतिष्ठा जपणे ही ख्रिस्तसभेची भूमिका आहे म्हणून गरीब दुर्बळांसाठी काम करण्यासाठी चर्चचा पुढाकार आहे. स्वत:चे काम झाल्यावर वेळ मिळाला तर इतरांसाठी काम करु ही भावना मनातून काढून सेवा कार्य करायला हवे असे प्रतिपादन आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांनी नंदाखाल येथे जनहीत ट्रस्टच्या दशवार्षिक वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात बोलताना केले. बिशप डॉ. थॉमस डाबरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

वसई जनहीत ट्रस्टच्या दशवार्षिक वर्धापन दिनानिमित्त नंदाखाल येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ते पुढे म्हणाले, जनहिताचे कार्य आपण केले नाही तर जीवन अपूर्ण राहील. जीवनाची परिपूर्णता करण्यासाठी इतरांच्या समस्या स्वत:च्या समजून आपण सर्वांनी दीनदलितांसाठी कार्य करु या!

यावेळी पूणे धर्मप्रांताचे बिशप डॉ. थॉमस डाबरे यांचे भाषण झाले. जागतिकीकरण झाल्यावरही दारिद्र्य वाढतच आहे. अतिश्रीमंती आणि अति गरीबी वाढत चालली आहे. विषमतेची दरी अधिक रुंदावत चालली असल्याने जेथे सरकार पोहचत नाही तेथे आपण पोहचले पाहिजे अशा भावनेने दहा वर्षापासून जनहीत ट्रस्ट कार्य करत आहे. अनेकांच्या श्रमातून ते दीनदुबळ्यांची सेवा करत आहेत असे ते म्हणाले. यावेळी वसई जनहीत ट्रस्टने प्रसिद्ध केलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन आर्चबिशपांच्या हस्ते झाले. ट्रस्टचे संचालक फा. बॅप्टीस्टा लोपीस यांनी प्रास्तविक भाषण केले. सूत्रसंचालन बेर्नादेत रुमाव यांनी तर आभार प्रदर्शन मेबल डिकुना यांनी केले. यावेळी मॉ. फ्रान्सिस कोरीया, फा. ॲन्ड्र्यू रॉड्रीग्ज, फा. थॉमस लोपीस आदि व्यासपिठावर उपस्थित होते. ●

# ‘अपंग सेवा’वर मदतीचा वर्षाव

## लायन्स क्लबने उभारले बालउद्यान

**वसई :** मागील २२ वर्षे निष्ठेने अपंग आणि मतिमंद मुलांची सेवा करणाऱ्या अपंग सेवा संस्थेला लायन्स क्लबने बाल उद्यान तयार करुन दिले. अपंग मेळाव्यासाठी जागा न मिळणे, अपमान-मानहानी अशा विविध संकटांना तोंड देत चिकाटीने उभ्या राहिलेल्या सिंथियाताईंना आता समाजाने उंचावले आहे. अनेक दानशूरांनी पुढे येऊन जमीन व प्रशस्त इमारत उभी करुन दिली व सिंथियाताईंची जागेची चिंता कायमची मिटवली. या इमारतीच्या आशिर्वादीकरणाचा व उद्घाटनचा सोहळा आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांच्या हस्ते १ जानेवारी २०१० रोजी पार पडला. त्याचे वृत्त रेमंड मच्याडो यांनी एक्झामिनरमध्ये दिले. ते वाचून लायन्स क्लबचे पदाधिकारी स्वत:हून वसईत आले व त्यांनी अभंग भवनासमोर अपंग-मतिमंद मुलांना खेळण्यासाठी सुंदर बगीचा व खेळाची सामुग्री लावून दिली.

या उद्यानाचे उद्घाटन नुकताच पार पडले. यावेळी लायन राजेश मेहरा, हसमुख जोबनपुत्रा, महेश गुप्ता, लॉरेन्स डिसुझा, सिक्वेरा आदि पदाधिकारी व्यासपिठावर होते. फा. मायकल जी यांनी या बालउद्यानाचे आशिर्वादीकरण केले. वसईतील ‘अपंग सेवा’ला मदत करण्याची प्रेणा आम्हांला ‘एक्झामिनर’मधून मिळाली असे लायन लॉरेन्स डिसुझा यांनी सांगितले. इतकेच नाही तर यापुढेही लायन्स क्लब मदतीसाठी पुढे येईल असे आश्वासन अध्यक्षांनी दिले. सुमारे ३ लाखाहून अधिक रक्कम खर्च करुन उभारलेल्या या बालउद्यानामुळे अपंगांच्या मुखावरील आनंद पाहून आम्हांला समाधान वाटले असे ते म्हणाले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने मुंबईतून मंडळी उपस्थित होती.

## ब्रिटो एनर्जीने लावली सोलार सिस्टीम

**वसई :** राष्ट्रीय पुरस्कार विजेते ब्रिटो एनर्जीचे बॅप्टीस्ट ब्रिटो यांनी अभंग भवनात सोलार सिस्टीम बसवून दिली आहे. सुमारे दिड लाख खर्चाच्या या सिस्टीममुळे अभंग भवनात अपंग, मतिमंद मुलांसाठी वीज, गरम पाणी याची चांगली सोय झाली. फादर मायकल जी यांच्या वाढदिवसाचा मुहुर्त साधून २३ मे २०१० रोजी या सिस्टीमचे उद्घाटन करण्यात आले.

रेकी ग्रँड मास्टर, वास्तुशास्त्रज्ञ व आतुरालय लाईफ मॅनेजमेंटचे संचालक श्री. मोहन गोखले यांनी मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केला. यश आणि अपयश, सुख आणि दु:ख यामध्ये अंतर फक्त एका श्वासाचं. केवळ जगू नका तर जिवंत राहा. वैश्विक प्राणशक्ती म्हणजे निसर्गातील ऊर्जा आपल्या शरीरात घ्या आणि हातावाटे दुसऱ्यांना द्या असे मोहन गोखले यावेळी बोलताना म्हणाले. अध्यक्षस्थानी बॅप्टीस्ट ब्रिटो होते.

अपंग सेवा अभंग भवनात आता नियमित मनोरंजन-प्रबोधनाचे कार्यक्रम लावत आहे. अनिल थत्ते ह्यांच्या ‘गगनभेदी’ गप्पानंतर हा दुसरा मोहन गोखले यांचा विशेष कार्यक्रम होत आहे. आगामी काळात ‘भल्याभल्यांची पोल खोलणारे पत्रकार हेमंत जोशी’, योगासने, प्राणायाम इ. कार्यक्रम आयोजित केले आहेत. अभंग भवन ही अपंग सेवाचे मेळावे, शिबिरे इत्यादी कार्यक्रम घेण्यासाठी अपंगांची हक्काची जाग झाली आहे. अशा कार्यक्रमाला अपंग सेवाच्या हितचिंतकांनी अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन सिंथिया बॅप्टिस्टा यांनी केले आहे. ●

# मुंबई जनता दल ( से ) अध्यक्षपदी प्रभाकर नारकर

**मुंबई :** मुंबई शहर जनता दल (से) च्या अध्यक्षपदी प्रभाकर नारकर यांची प्रदेश अध्यक्ष शरद पाटील यांनी नियुक्ती केली आहे. प्रभाकर नारकर महाराष्ट्र टाइम्समध्ये जेष्ठ पत्रकार म्हणून काम करत होते. शोध पत्रकारितेमध्ये त्यांना पुरस्कारही लाभले होते. मंत्रालयात पत्रकाराचे काम करताना त्यांच्यातील संवेदनशील कार्यकर्त्यांने सत्तेचे राजकारण जवळून पाहिले. तसेच राजकीय पक्षाच्या दावणीला बांधलेली पत्रकारिताही अनुभवली. कोणतीही समस्या राजकारणाशीच जोडलेली असते व लोकशाही राजव्यवस्थेत प्रश्नांची उत्तरे राजकीय क्षेत्रातच उतरून सोडवावी लागतात असे मानणाऱ्या नारकर यांनी महाराष्ट्र टाइम्समध्ये चांगल्या नोकरीचा स्वेच्छानिवृत्ती घेऊन राजिनामा दिला व ते पूर्णवेळ पक्षाचे काम करत आहेत.

समाजातील सर्वच स्तरात नारकर यांचा वावर आहे. स्पष्टवक्तेपणा हा त्यांच्याकडे असलेला दुर्मिळ गुण. मुळचे कोकणात राहणारे नारकर कोकणातही चाललेल्या ऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात चळवळीत ग्रामस्थांनी बाजू घेऊन उभे आहेत. मनाशी आशावाद आणि कार्य करण्याची ऊर्जा असलेला हा कार्यकर्ता नव्या उमेदीने जनता दलाच्या कामामध्ये गुंतून पडला आहे. वसईतील पोलीस लाठीमारांच्या वेळी स्वत: जयप्रकाश नारकर व वसंतराव शिराळी यांना बरोबर घेऊन वसईत येऊन प्रत्यक्ष माहिती घेतली व मृणालताई सोबत बोलून ताबडतोब गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्याबरोबर वसईतील पिडीतांची बैठक लावली. इतकेच नव्हे तर मुलांना मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करण्यासाठी बालहक्क आयोगाकडे तक्रार गुदरली आणि महिलांवरील अत्याचाराविरोधात महिला आयोगाकडेही तक्रार गुदरली. नारकर यांचा मृदू स्वभाव आणि काम करण्याची प्रबळ इच्छाशक्ती त्यांना मुंबईतील आजच्या गढूळ वातावरणात पक्ष कार्य करण्यास शक्ती देणारे ठरेल. ●

# जेष्ठ समाजवादी आणि समाज शिक्षक मशाद गुरुजी यांचा हृद्य सत्कार

**विरार :** जेष्ठ समाजवादी कार्यकर्ते आणि नंदाखाल परिसरात ७० वर्षापूर्वी शिक्षणाचा पाया घालणारे हजारो विद्यार्थ्यांचे शिक्षक मशाद गुरूजी (फिलीप मच्याडो) यांचा नव्वदीपूर्ती निमित्ताने त्यांच्या प्रथम विद्यार्थिनी जानूबाई तुस्कानो आणि पिलीबाई (निंबा) डिमेलो यांच्या हस्ते नंदाखाल हायस्कूलच्या दुमिबाई फिलीप मच्याडो सभागृहात शाल, श्रीफळ व मानपत्र देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. निर्भय जन मंचने आयोजित केलेल्या या सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंट जोसेफ हायस्कूल व ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य फादर थॉमस लोपीस होते.

स्वातंत्र्यपूर्वकाळात वसई तालुक्यातील नंदाखाल परिसरात शिक्षणाचे काहीही साधन नव्हते. त्यावेळी दूरदृष्टी असलेले फादर रेमंड मेंडीस नंदाखाल चर्चमध्ये कार्यरत होते. त्यांनी फिलीप मच्याडो सारख्या शिकलेल्या तरुणाला शिक्षक बनवून नंदाखाल येथे शाळेचा पाया घातला. पालकांचा विरोध डावलून मुलांना त्यांच्या घरुन शाळेत आणायचे काम मशादगुरूजींनी फादर मेंडीस यांच्याबरोबरीने केले. इतरत्र चांगल्या पगाराच्या नोकरीची संधी असूनही केवळ आपल्या समाजाच्या उत्थानासाठी मशादगुरूजींनी केवळ १० रुपये पगारावर शिक्षकाचे काम सुरू केले व शेवटपर्यंत ते करत राहिले. आता त्यांचे हजारो विद्यार्थी देशा-परदेशात जबाबदारीचे काम करत आहेत.

स्व. प्रा. स. गो. वर्टी, पंढरीनाथ चौधरी, डॉ. म. ग. परुळेकर या समाजवादी नेत्याबरोबर त्यांनी काम केले. आजही ते जनता दल (से) शी जोडलेले आहे. १९६१ साली ते कोफराड ग्रामपंचायतीचे सरपंच होते. अपूरी साधनसामुग्री व अपूरा निधी असूनही त्यांनी त्याही काळात लक्षणीय काम केले. समाजसेवा मंडळाचेही त्यांनी काम केले.

जेष्ठ नागरिक संघटना, ज्ञानदीप मंडळ, समाजसेवा मंडळ, जनता दल (से), शिक्षक संघटना, त्यांचे सहकारी शिक्षक पॉल रुमाव, जेष्ठ समाजवादी नेते पी. पी. राऊत, यज्ञेश्वर पाटील, रामचंद्र भोईर, फ्रँकलिन डायस आर्दीनीही त्यांचा सत्कार केला.

प्रास्तविक भाषण निर्भयचे प्रमुख मनवेल तुस्कानो यांनी केले. समाज घडविणाऱ्या मशाद गुरूजींना ९०व्या वर्षी त्यांच्या उपकाराचे पांग फेडण्यासाठी निर्भयने सत्काराचे आयोजन केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी नवी मुंबई येथे विज नियामक आयोगासमोर वीजदरवाढ व भारनियमनाविरुद्ध वसई तालुक्यातील निर्भय जन मंचचे कार्याध्यक्ष जॉन परेरा आणि जनता दलाचे तालुका सेक्रेटरी पायस मच्याडो उपस्थित राहिले होते. त्यांनी प्रभावी व लक्षणीय युक्तीवाद केल्याबद्दल त्यांचाही फादर थॉमस लोपीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

जेष्ठ शिक्षक पॉल रुमाव, फ्रँकलिन डायस, फिलीप तुस्कानो, सि. मेरीलीन मच्याडो, फा. कॅजिटन रॉड्रीग्ज, बावतीस ब्रिटो, ज्ञानदीप मंडळाचे आलेक्स तुस्कानो, एस. के. लोपीस आणि अध्यक्ष फा. थॉमस लोपीस आर्दीची भाषणे झाली. सुत्रसंचालन जॉन परेरा यांनी केले. मानपत्र वाचन सुमन मच्याडो यांनी तर आभार प्रदर्शन पायस मच्याडो यांनी केले. ●

## सौ. वंदना नोवेल डाबरे यांचे अभिनंदन

**वसई :** बॅसीन कॅथोलिक को-ऑप. बँकेत काम करणाऱ्या सौ. वंदना नोवेल डाबरे यांनी २००९-१० या आर्थिक वर्षात तीन महत्वाच्या परीक्षा देऊन चांगले यश मिळविले आहे.

1) IIBF JAIIB (2) IIBF CAIIB (३) दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक असोशिएशनद्वारे संचलीत DCBM ची परिक्षा प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण. निर्भय परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.

# काँग्रेस नेत्यांनी राजीव गांधींचे अनुकरण करावे - फा. मायकल जी

**मुंबई :** देश स्वतंत्र होऊन ६८ वर्षे झाली. महाराष्ट्र राज्य स्थापन होऊन ५० वर्षे झाली पण आजही ४०% जनता द्रारिद्र्य रेषेखाली खितपत पडली आहे. भ्रष्टाचारामुळे सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत. राज्यकर्ते-कंत्राटदार, गुंड यांचे संगनमत असल्याने पैसा हडप केला जातो. स्व. राजीव गांधींनीच म्हटले होते, '१०० पैकी ९० रुपये सत्तेचे दलाल मध्येच लुटतात त्यामुळे विकासाचा लाभ गरीबांना मिळत नाही.' स्व. राजीव गांधींची तळमळ लक्षात घेऊन आताच्या राज्यकर्ता काँग्रेस पक्षाने त्यांचे अनुकरण करावे असे आवाहन जेष्ठ धर्मगुरू फा. मायकल जी यांनी मुंबईत स्व. राजीव गांधी यांच्या १९व्या पुण्यतिथी निमित्त काँग्रेसने आयोजित केलेल्या सर्वधर्मिय श्रद्धांजली सभेत बोलताना केले.

प्रदेश काँग्रेसतर्फे मुंबईत काँग्रेस हाऊसमध्ये आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत ख्रिस्ती धर्मगुरू फा. मायकल जी यांना पाचारण केले होते. बायबल मधील लुकच्या शुभवर्तमानातील उतारा वाचून येशू ख्रिस्ताने 'गरीबी हटाव' साठी दिलेली शिकवण सांगून फा. मायकल जी म्हणाले, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील, आदिवासी नक्षलवादी बनणार नाहीत, गरीबांचे जीवन सुसह्य होईल यासाठी झटण्याची आपण सर्वांनी शपथ घेऊ या. तीच खरी स्व. राजीव गांधींना श्रद्धांजली ठरेल.

यावेळी प्रदेश काँग्रेस अध्यक्ष माणिकराव ठाकरे, मुंबई अध्यक्ष कृपाशंकर सिंह, अनेक आमदार, नगरसेवक, पदाधिकारी हजर होते. ●

## गंगाधर पटने यांना पुत्रशोक

**नांदेड :** जनता दलाचे माजी आमदार गंगाधर पटने यांचे पुत्र विजय पटने यांचे अलिबाग येथे समुद्रात बुडून निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ४२ वर्षे होते. त्यांच्यामागे पत्नी, २ मुलगे असा परिवार आहे. स्व. विजय पटने मॅकॅनिकल इंजिनियर होते. परिवारासह ते अलिबाग येथे गेले होते. समुद्रात गेले असताना लाटेमध्ये ते ओढले गेले. त्यांच्या निधनामुळे मुख्यमंत्री अशोक चव्हाण, मंत्री जयंत पाटील, डॉ. बापूसाहेब काळदाते, मृणालताई गोरे, प्रा. शरद पाटील आदी अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

## डॉ. लेस्ली घोन्सालविस यांना पितृशोक

**वसई :** वसईतील सुप्रसिद्ध डॉक्टर लेस्ली घोन्सालविस यांचे पिताश्री फ्रान्सिस थॉमस घोन्सालविस यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. त्यांच्यामागे पत्नी, २ मुलगे, २ मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. वसई धर्मप्रांताचे आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो यांच्या पौरोहित्याखाली त्यांच्यावर रमेदी चर्चमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

## जयसेन पाटील यांचे निधन

**वसई :** नरवीर चिमाजी या वसई तालुक्यातील सर्वात जुन्या स्थानिक वर्तमानपत्राचे संपादक जयसेन पाटील यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्षे होते. त्यांच्या मागे पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

स्व. जयसेन पाटील स्पष्टवक्ता व निर्भिड पत्रकार होते. १९६८ साली त्यांनी जयभवानी प्रिटींग प्रेस गिरगाव येथे सुरू केली. १९७० मध्ये सत्यचित्र हे साप्ताहिक त्यांनी जेष्ठ पत्रकार कुमार केतकर, अरूण साधू, दिनकर गांगल यांचेबरोबर मुंबईत चालविले. १९८८ साली वसईतून नरवीर चिमाजी हे पत्र त्यांनी सुरू केले. सत्य व वास्तव स्पष्ट शब्दात मांडण्यात त्यांनी कोणाचीही भीडभाड ठेवली नाही. दहशतवाद, गुंडगिरी, ढोंगबाजी यावर त्यांनी टिकेचे प्रहार केले. निर्भय जन मंचने आयोजित केलेल्या आराखडा विरोधी, दहशतवाद व गुन्हेगारी विरोधी आणि आता महानगरपालिकाविरोधी सर्व आंदोलनाला नरवीर चिमाजीने ठळक प्रसिद्धी दिली आहे. निर्भयने नोव्हेंबर १९९४ मध्ये निष्पाप जीवांच्या हत्याकांडाविरुद्ध व वसईतील गुन्हेगारी विरोधात विधान सभेवर काढलेल्या मोर्चाला बॅनर लाईनसह तीन दिवस पहिल्या पानावर मोठी प्रसिद्धी दिली. दहशतवादाविरोधात नंदाखाल येथे आयोजित केलेल्या उल्हास जोशींच्या विशाल सभेत ते स्वत: उपस्थित होते व त्या वृत्तास त्यांनी ठळक प्रसिद्धी दिली. वैयक्तिकरित्या त्यांनी आम्हांला सतत पाठिंबा दिला आहे.

समाजातील सर्व लहान-मोठ्या घटनांचे वास्तव व सत्य प्रतिबिंब चिमाजीमध्ये सातत्याने वस्तुनिष्ठपणे त्यांनी मांडले. जयसेन पाटील यांच्या निधनाने वसई तालुक्यातील एक स्पष्टवक्ता पत्रकार काळाच्या पडद्याआड गेला. त्यांच्या स्मृतीस निर्भय परिवाराचा सलाम!

# हरवला आहे

*ए.सी. ऑफिस, स्वतंत्र केबीन*
*फटाकडी सेक्रेटरी, दिवसभर मिटिंग्जच मिटिंग्ज*
*मिटिंग्जमुळे खूप भेटी राहिल्या आहेत*
*सगळ्या मिटिंग्ज सोडून ज्याला भेटावं*
*असा लंगोटीयार मात्र हरवला आहे,*
*हरवला आहे.*

*भरपूर पगार, उदंड सेव्हिंग*
*मनसोक्त शॉपिंग, सामानाच ढिगच ढिग*
*सामानाच्या ढिगाखाली खूप गोष्टी दडल्या आहेत*
*चूक करुन ज्याच्या आड लपावं*
*असा आईचा पदर मात्र हरवला आहे,*
*हरवला आहे.*

*दिवसाआड पार्टी, कधी पब कधी डिस्क*
*धुंद रात्र मस्तीची, प्याल्या प्याल्यातून झिंगच झिंग*
*चिअर्सच्या चित्कारात खूप आवाज विरून गेले आहेत*
*ज्या आवाजांनी हृदयाला साद घालावी*
*असा आरतीचा गजर मात्र हरवला आहे,*
*हरवला आहे.*

*कारच्या वेगात, सायकलची फेरी हरवली आहे*
*हॉटेलच्या खाण्यात, फोडणीची पोळी हरवली आहे*
*तारांकित क्रुझच्या आरामात, पंढरीची वारी हरवली आहे*
*पिकनिक स्पॉटच्या गर्दीत, मामाचा गाव हरवला आहे*
*बंद दाराच्या अपार्टमेंटमध्ये, शेजार हरवला आहे*
*डिजे व्हिजेच्या गोंगाटात, वासुदेवाची मुरली हरवली आहे*
*साठ फुटी सिमेंटच्या रस्त्यात, वडाची सावली हरवली आहे*
*कॉन्व्हेंटच्या अट्टाहासात, बाराखडी हरवली आहे*
*हाय, हॅलो, थँक यूमध्ये, साधीभोळी अनौपचारिकता*
*हरवली आहे*
*फायद्या-तोटयाच्या गणितात, उत्स्फूर्तता हरवली आहे*
*निलाजऱ्या रिमिक्समध्ये, निरागसता हरवली आहे*
*धकाधकीच्या दिनक्रमात, निवांत गप्पा हरवल्या आहेत*
*चौकोनी कुटुंबात, नाती हरवली आहेत*
*सिमेंटच्या जंगलात, माती हरवली आहे*

*आम्ही धावणार करिअरमागे, बाकी कशाची खंत नाही*
*कशा कशाचा हिशोब मांडू?*
*ह्या चकचकीत मॉडर्न जगण्यात जिंदगीच हरवली आहे*
*जिंदगीच हरवली आहे.*

– E-mail संग्राहक – सुमन पायस मच्याडो, नंदाखाल

# वसईतील पोलीस लाठीमाराच्या चौकशीबाबत मृणाल गोरे यांची गृहमंत्र्याकडे विचारणा

**मुंबई :** (वसंत शिराळी) ५ मार्च २०१० रोजी वसईतील आंदोलकांवर व वाघोली-मर्देस येथील निरपराध स्त्री-पुरुषांवर पोलिसांनी केलेल्या निघृण लाठीमाराची चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याचे आश्वासन राज्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी मृणालताई गोरे यांना वसईतील जनता दलाच्या शिष्टमंडळाच्या भेटीच्या वेळी दिले होते. त्याबाबत काय कारवाई झाली याची विचारणा जेष्ठ जनता दल नेत्या मृणालताई गोरे यांनी राज्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांना लेखी पत्र देऊन केली आहे.

वसई तालुका जनता दलाने पोलीस महानिरीक्षक परमवीर सिंह यांना लेखी पत्र लिहिले आहे. जखमी स्त्री-पुरुषांचे जबाब जनता दल कार्यकर्त्यांनी पोलिसांसमवेत जाऊन नोंदविले होते. यावेळी जखमी स्त्री-पुरुषांनी त्यांना मारहाण व फोडतोड करणाऱ्या अनेक पोलिस अधिकारी व पोलिसांची नावे दिलेली आहेत. त्याबाबत चौकशी करुन कडक कारवाई केली जावी अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

वसई तालुक्यातील महानगरपालिका विरोधी आंदोलकांवर पोलिसांनी दि. ५ मार्च २०१० रोजी जबर लाठीमार करुन त्यांना जबर जखमी केले होते. वाघोलीजवळ मर्देस गावात घुसून पोलिसांनी निरपराध स्त्री-पुरुषांना जबर मारहाण केली व अनेक घरांचे जबर नुकसान केले. याबाबत जेष्ठ समाजवादी नेत्या मृणालताई गोरे यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे गृहमंत्री मा. आर. आर. पाटील यांची जनता दलाच्या शिष्टमंडळाने जखमी महिलांसह भेट घेऊन त्यांना निवेदन दिले होते. मा. गृहमंत्र्यांच्या सूचनेनुसार दुसऱ्या दिवशी दि. १० मार्च २०१० रोजी सकाळी पोलीस महानिरीक्षक परमवीर सिंह यांनी जनता दल नेत्यांबरोबर येऊन वाघोली-मर्देस गावांतील जखमी स्त्री-पुरुषांशी बोलून माहिती घेतली व पुढे पोलिसांनी त्याचे जबाब नोंदवले होते.

जखमी लोकांनी त्यांना मारहाण करणाऱ्या पोलिसांची नावे जबाबात नोंदवली आहेत. आंदोलकांवर निघृण लाठीमार करणाऱ्या पोलिसांनी जनावरांप्रमाणे त्यांना मारले तर वाघोली-मर्देस येथील संपूर्ण निरपराध स्त्री-पुरुषांना दरोडेखोराप्रमाणे घरावर हल्ले करुन बेदम मारले. अशा प्रकारे लोकांना मारहाण करणाऱ्या पोलिसांवर कारवाई होणे आवश्यक आहे अशी मागणी करण्यात आली आहे. ●

# कमी दाब आणि भारनियमनाबाबत निर्भयची वीज अधिकाऱ्यांशी चर्चा

**वसई :** मागील अनेक महिन्यांपासून विजेचा दाब कमी येत असून वारंवार वीज गायब होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. वसई तालुक्यात विशेषत: कोफराड, वटार परिसरात विजेचा पुरवठा कमी दाबाचा येत आहे. विजेचा दाब तपासला गेला असता तो १५० व्होल्टच्याही खाली येतो. परिणामी विजेवर चालणारी सर्व उपकरणे बंद पडत आहेत. शेती पंप चालत नाहीत. घरगुती उपकरणे खास करुन उकाड्याच्या दिवसातील पंखेही पूर्ण वेगाने चालत नाहीत. रात्रीच्या वेळी बाजारहाट करण्याची व लोक घरी येण्याची वेळ असते. त्यावेळेला सायंकाळी ८-९ वाजेपर्यंत सर्वत्र अंधाराचे राज्य असते. विशेष करुन महिलांना रात्री घरी येताना सुरक्षितता वाटत नाही.

भारनियमनाव्यतिरिक्तही वीज सतत खंडीत होत असते. शिवाय वीज पुरवठा सातत्याने कमी जास्त प्रमाणात होत आहे. ट्रान्स्फॉर्मरच्या क्षमतेपेक्षा अधिक लोड ट्रान्स्फॉर्मरवर असल्यामुळे असे प्रकार होत आहेत. म्हणून सर्व ट्रान्स्फॉर्मरचे समिक्षा करुन, पिक वेळेमध्ये लोड तपासून ज्या ठिकाणी अधिक लोड आहे त्या ठिकाणी अधिक क्षमतेचा ट्रान्स्फॉर्मर बसवावेत व वीज पुरवठा पूर्ण दाबाचा व नियमित करावा अशा मागणी निर्भय जन मंचने दि. २६-५-२०१० च्या पत्राने अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. वसई यांचेकडे केली आहे.

यासंबंधी निर्भय जन मंचचे कार्याध्यक्ष जॉन परेरा व जनता दलाचे (से) तालुका चिटणीस पायस मच्याडो यांनी नुकतीच अधिक्षक अभियंता श्री. राठोड यांची वसई पूर्व येथील कार्यालयात भेट घेऊन सविस्तर चर्चा केली व परिसरांतील वीज व्यवस्थेची माहिती दिली. त्यांनी लगेच दखल घेऊन सहाय्यक अभियंता श्री. भामरे यांना ताबडतोब पाहणी करण्यास सांगितले. भामरे यांनी नंदाखाल परिसरात, उंबरगोठण, सत्पाळा, मेढे, रुमाव, वटार, परसाव, पेढी, केदार या गावात जाऊन व्यवस्थेची पाहणी केली. एके दिवशी रात्री येऊन निर्भयच्या कार्यकर्त्यांसह वीज दाब कमी असल्याची पाहणी केली व युद्ध पातळीवर प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. काही वाढीव क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर लावण्याचेही त्यांनी मान्य केले.

यावेळी जॉन परेरा, पायस मच्याडो, रॉबर्ट डिमेलो, लुईस रुमाव, अमित रॉड्रीग्ज, जॅक्सन रॉड्रीग्ज, आलम रॉड्रीग्ज, ऑलिव्हर रॉड्रीग्ज, ब्रायन रॉड्रीग्ज, सीझर क्रास्टो आदि कार्यकर्ते उपस्थित होते.